MHAU070016802022

## नियमित दिवाणी दावा क्र.२२६/२०२२

### संतोष कवडे वि. कचरु कवडे व इतर मधील नि.क्र.३० खालील आदेश

दि.१८/१०/२०२४

०१. वादी याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ याने त्याचे टि.सी. (ट्रान्सफर सर्टिफिकेट) वादी यास देण्याबाबत आदेश व्हावे या करीता दिलेला आहे.

०२. वादीची विनंती थोडक्यात खालीलप्रमाणे :–

वादी व प्रतिवादी क्र.१ हे पिता व पुत्र असुन वादी हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, बदनापुर, येथे बी.बी.ए.चे शिक्षण घेत असुन त्याने जातीय प्रवर्गातुन स्कॉलरशिप मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्याकामी त्यास जात पडताळणी (कास्ट वॅलिडिटी) करुन त्याचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत सांगण्यात आले आहे. त्याकामी प्रतिवादी क्र.१ याच्या टि.सी. ची आवश्यकता आहे. प्रतिवादी क्र.१ च्या टि.सी. शिवाय वादीचे कास्ट वॅरिफिकेशन होण्यास अडचण निर्माण होत आहे. त्याबाबत प्रतिवादी क्र.१ यास कळवुन टि.सी. ची मागणी केली असता त्याने सदर टि.सी. देण्यास नकार दिला. त्यामुळे वादी याचे शैक्षणिक नुकसान होईल. करीता अर्ज असे.

०३. प्रतिवादी क्र.१ व त्याचे विद्वान विधिज्ञ यांना दुपारी ०५.१० पर्यंत सतत पुकारले असता गैरहजर.

०४. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ उपस्थित. त्यांनी प्रस्तुत अर्जावर आजरोजी आदेश पारित व्हावा अशी विनंती केली.

०५. वादी याने प्रस्तुत अर्जाच्या पृष्ठर्थ नि.क्र.३२/१ अन्वये त्याने जात पडताळणीसाठी दाखल केलेला अर्ज केल्याबाबत ऑनलाईन रिपोर्ट दाखल केला आहे. वादी याच्या कथनांच्या पार्श्वभुमीवर अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा हा वादी याने वाटप व स्वतंत्र ताब्याकरीता दाखल केल्याचे दिसुन येते. अभिलेखावरुन वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यानचे नातेसंबंध आव्हानित असल्याचे दिसुन येत नाही.

त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ याने वादीच्या जात पडताळणीकामी त्याच्याकडे असणारे कागदपत्रे वादीस त्याकामी देणे आवश्यक आहे. ते प्रतिवादी क्र.१ चे नैतिक कर्तव्य आहे. प्रस्तुत कागदपत्रांच्या अभावी वादी याचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :–

**आ दे श**

अर्ज पुढीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे :–

१. प्रतिवादी क्र.१ यांना निर्देशित करण्यात येते की, वादीच्या जात पडताळणीकामी वडिल म्हणुन आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्रांची पुर्तता त्यांनी स्वतः उपस्थित राहुन करावी व त्यास त्याकामी सहकार्य करुन त्याबाबतचा अहवाल न्यायालयात सादर करावा.

२. जात पडताळणीचे काम पुर्ण झाल्यानंतर वादी याने प्रतिवादी क्र.१ ने दिलेली सर्व मुळ कागदपत्रे आहे त्या मुळ स्थितीत प्रतिवादी क्र.१ यास परत करावीत व त्याबाबतचा अहवाल न्यायालयास सादर करावा.

*(खुल्या न्यायालयात वाचन आणि उदघोषित करण्यात आले).*

PATIL PRAJAKTA
Digitally signed by PATIL PRAJAKTA
Date: 2024.10.18 17:36:04 +0530

दिनांक :– १८/१०/२०२४

(पी.बी. पाटील)

सह–दिवाणी न्यायाधीश, क.स्तर

गंगापुर

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/ Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Kishor Raosaheb Tandale |
| Name of the Court | P.B.Patil, Jt.Civil Judge Jr. Dn. & J.M.F.C., Gangapur-2. |
| Judgment signed by the P.O.on | 18.10.2024 |
| Judgment uploaded on | 18.10.2024 |